# महासागर अमरावती

बुधवार, दि. 16 ऑक्टोंबर 2024




## काँग्रेसला 6, शिवसेने ला 1 आणि राष्ट्रवादीला 1

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि.15)**– काँग्रेस, शिवसेना(उबाठा), आणि राष्ट्रवादी(शप) व इतर मित्रपक्ष मिळून बनलेल्या महाविकास आघाडीमध्ये अमरावतीत कोणती जागा कोणत्या पक्षाला सुटेल याकडे सर्वांचे लक्ष लागून होते. मात्र आता जवळपास मविआ चा जागा वाटपाचा फॉर्मुला जवळजवळ निश्चित झाला आहे. ज्यामध्ये अमरावतीमध्ये काँग्रेसला सर्वाधिक 8, शिवसेनेला 1 आणि राष्ट्रवादीला 1 जागा मिळाल्याचे सांगण्यात येत आहे.

यामध्ये काँग्रेसला धामणगाव रेल्वे, तिवसा, अमरावती, अचलपूर, मेळघाट व दर्यापूर असे सहा मतदारसंघ सोडण्यात आले असल्याची माहिती आहे. तर मोर्शीमध्ये शरद पवारांच्या तुतारीकरिता जागा सोडण्यात आली असल्याची माहिती आहे. तर बडनेरा मतदारसंघ शिवसेनेला (ठाकरे गट) जागा सुटली असल्याची माहिती सुत्राकडून मिळाली आहे. त्यामूळे आता महाविकास आघाडीला बंडखोरांच्या मोठ्या आव्हानाचा सामना करावा लागणार आहे. बंडखोरांना समजाविण्यातच मोठी ताकद पक्षाच्या नेत्यांना खर्ची घालावी लागणार असल्याचे दिसत आहे.

# विधानसभा निवडणुकीच्या बिगुल वाजला



## 20 नोव्हेंबरला मतदान, 23 ला मतमोजणी

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,(दि.15)–विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या तारखा जाहिर झाल्या असून, 20 नोव्हेंबरला मतदान आणि 23 नोव्हेंबर रोजी मतमोजणी होणार आहे. त्यामुळे आता विधानसत्रा सार्वत्रिक निवडणुकीच्या रणधुमाळीला सुरुवात झाली आहे. मंगळवारी जिल्हा प्रशासनामार्फत पत्रपरिषद घेऊन नागरिकांना मतदान करण्यासाठी पुढे येण्याचे आणि मतदान प्रक्रिया शांततेत पाडण्याचे आवाहन करण्यात आले आहे. जिल्हा प्रशासनाने निवडणुकीच्या अनुषंगाने केलेल्या तयारीचा आढावा पत्रपरिषदेतून सांगण्यात आला असून, निवडणूकीसाठी निवडणूक विभाग, महसूल विभाग व पोलिस प्रशासन सज्ज असल्याचे सांगण्यात आले.**

## मतदान प्रक्रियेत शांततेत पार पाडा-जिल्हाधिकारी

## जिल्हा प्रशासनाने कसली कंबर





विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीची घोषणा करण्यात आली आहे. त्यानुषंगाने आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. निवडणुकीदरम्यान सर्वांनी आदर्श आचारसंहितेचे पालन करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयात निवडणुकीच्या अनुषंगाने विभागप्रमुखांची बैठक घेण्यात आली. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता मोहपात्रा, महापालिका आयुक्त सचिन कलंत्रे, पोलिस आयुक्त नविनचंद्र रेड्डी, जिल्हा पोलिस अधीक्षक विशाल आनंद, निवासी उपजिल्हाधिकारी अनिल भटकर, निवडणूक उपजिल्हाधिकारी शिवाजी शिंदे आदी उपस्थित होते.

### रोखीच्या वाहतुकीवेळी पुरावा आवश्यक

रोख रक्कम वाहतूक करताना पुरावा बाळगावा, तसेच रोख रक्कम जवळ ठेवणे टाळावे, जे व्यक्ती रोख रक्कमेची वाहतुक करेल, त्यांच्याकडे त्या रक्कमेचे दस्तावेज आवश्यक राहील. अन्यथा ती रोख जप्त करण्यात येईल. असे जिल्हाधिकारी कटियार यांनी सांगितले.

### 85 वर्षावरील आणि दिव्यांगांना घरूनच करता येईल मतदान

मतदारांच्या सोयीसाठी मतदान केंद्रावर विविध सुविधा देण्यात येणार आहे. मतदान केंद्रावर गर्दी होऊ नये यासाठी यावेळी अधिक मतदान केंद्र राहणार आहे. तसेच 85 वर्षावरील आणि दिव्यांग मतदारांना घरून मतदान करण्याची सुविधा देण्यात येणार आहे. मतदारांना त्यांचे मतदान केंद्र माहिती व्हावे, यासाठी बीएलओमार्फत चिठ्ठी वाटप करण्यात येणार आहे. यावर निगराणी करण्यासाठी विशेष सुविधा निर्माण करण्यात आली आहे.

### जिल्ह्यात 253884 मतदार, 2708 मतदान केंद्र

विधानसभा निवडणुकीचा बिगुल वाजताच जिल्हा निवडणूक विभाग सज्ज झाला आहे. विधानसभा निवडणुकीसाठी जिल्हा प्रशासनाने सर्व तयारी केली असून जिल्ह्यातील 8 विधानसभा मतदारसंघात एकूण 25 लाख 3 हजार 884 मतदार आहेत. त्यासाठी जिल्ह्यात एकूण 2 हजार 708 मतदान केंद्रे सज्ज केले आहेत. यावेळी जिल्ह्यात 1 लाख मतदार वाढले आहेत, त्याचप्रमाणे लोकसभा निवडणुकीत उघडकीस आलेली अनियमितता पाहता आता जिल्ह्यात 18 नवीन मतदान केंद्रे वाढविण्यात आली आहेत. जेणेकरून यावेळी कोणत्याही प्रकारची अनियमितता होणार नाही, अशी माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी सौरभ कटियार यांनी मंगळवारी प्रसारमाध्यमांसोबत दिली.

### उमेदवारांना 40 लाखांच्या खर्चाची मर्यादा

उमेदवारांना निवडणुकीसाठी 40 लाख खर्चाची मर्यादा राहणार आहे. तसेच विविध परवानगीसाठी एक खिडकी सुविधा उपलबध राहणार आहे. सभांसाठी मैदान राखीव ठेवण्यात येणार आहे. पूर्ण तपासणीअंती मैदानाचे आरक्षण करण्यात येणार आहे. कुणालाही अगाऊ आरक्षण करून ठेवता येणार नाही. यासाठी सात दिवसाआधी अर्ज करावा लागणार आहे.

### राजकीय झेंडे, पोस्टर्स, बॅनर तातडीने काढणार

निवडणुकीच्या अनुषंगाने तातडीने करावयाच्या कार्यवाहीमध्ये सार्वजनिक ठिकाणी असलेले राजकीय पक्षांचे झेंडे, फोटो तातडीने काढण्यात यावेत. तसेच राजकीय पक्षांनी स्वतऱ्हून त्यांचे प्रचार साहित्य काढण्याचे आवाहन केले. निवडणूक कालावधी हा महत्वाचा कालावधी असल्याने सर्व विभागप्रमुखांनी दक्ष राहून कारवाई करावी. कायदा आणि सुव्यवस्था राखणे आणि निवडणूक विषयक कामकाज करण्यासाठी तातडीने मनुष्यबळ उपलब्ध करून घ्यावे, असे निर्देश जिल्हाधिकारी यांनी दिले.

### 70 टक्के मतदानाचे लक्ष्य

शहरी भागात मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी स्वीप अंतर्गत कार्यक्रम घेण्यात यावेत. लोकसभा निवडणुकीमध्ये मतदानात 3 टक्के वाढ झाली आहे. ही चांगली बाब आहे. येत्या निवडणुकीत 70 टक्के मतदान होण्यासाठी सर्व यंत्रणांनी प्रयत्न करावेत. यासाठी जनजागृतीचे कार्यक्रम राबविण्यासाठी पुढाकार घ्यावा. मतदारांना सध्यास्थितीमध्ये मतदान नोंदणी करता येणे शक्य आहे. मतदारांनी मतदान यादीमध्ये आपले नाव नसल्यास तातडीने नोंदणी करावी. यामुळे मतदानाच्या हक्कापासून कुणीही वंचित राहणार नाही, असे आवाहन जिल्हाधिकारी यांनी केले आहे.

### विधानसभा निहाय मतदार संख्या

| विधानसभा | पुरुष | महिला | इतर | एकूण |
|---|---|---|---|---|
| अमरावती | 185150 | 180668 | 26 | 365844 |
| बडनेरा | 178508 | 174496 | 43 | 353047 |
| धा. रेल्वे | 159438 | 155823 | 03 | 315264 |
| तिवसा | 149426 | 142378 | 02 | 291806 |
| दर्यापूर | 157092 | 148167 | 03 | 305262 |
| मेळघाट | 152445 | 144740 | 11 | 296196 |
| अचलपूर | 147563 | 141032 | 05 | 288600 |
| मोर्शी | 147736 | 140126 | 01 | 287865 |
| एकूण | 1277358 | 1226432 | 94 | 2503884 |

### 20 नोव्हेंबरला मतदान, 23 नोव्हेंबरला निकाल

निवडणूक पत्रकार परिषदेत सविस्तर माहिती देताना जिल्हादंडाधिकारी कटियार म्हणाले की, विधानसभा निवडणुकीची अधिसूचना 22 ऑक्टोबर रोजी जारी केली जाणार आहे. उमेदवारी अर्ज भरण्याची शेवटची तारीख 29 ऑक्टोबर आहे. उमेदवारी अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवसानंतर 30 ऑक्टोबर रोजी निवडणूक अधिकारी उमेदवारांच्या अर्जांची छाननी करणार आहेत. महाराष्ट्रात विधानसभा निवडणुका एकाच टप्प्यात होणार आहेत. 20 नोव्हेंबर रोजी मतदान होणार असून 23 नोव्हेंबर रोजी मतमोजणी झाल्यानंतर निकाल जाहीर केला जाणार आहे.

## बडनेरा रेल्वे स्थानकावर आढळला तरुणीचा मृतदेह

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 15)** – बडनेरा रेल्वे स्थानकामागील वाहनाच्या पार्किंगजवळ एका 35 वर्षीय तरुणीचा विवस्त्र अवस्थेत मृतदेह आढळून आल्याने मंगळवारी सकाळी खळबळ उडाली आहे. मुलीच्या मृतदेहा जवळ रक्ताचे डाग दिसून आले असून तिच्या चेहर्यावर व शरीरावर जखमेच्या खुणा दिसत होत्या. त्यामुळे मुलीचा खून झाल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. बडनेरा रेल्वे स्थानकामागील पार्किंगजवळील पाण्याच्या टाकीखाली खोली करण्यात आली आहे. या खोलीजवळ एका अनोळखी मुलीचा मृतदेह जमिनीवर आढळून आला. तीचा मृतदेह विवस्त्र होता. या घटनेची माहिती परिसरातील लोकांनी पोलिसांना दिली. त्यानंतर रेल्वे सुरक्षा बल (आरपीएफ), रेल्वे पोलिस (जीआरपी) आणि बडनेरा पोलिसांचे पथक घटनास्थळी पोहोचले. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा केला आहे. परंतू मृतदेहाची ओळख अद्याप पटलेली नाही. युवतीची हत्या झाल्याची चर्चा परिसरात रंगली होती. या घटनेच्या अनुषंगाने पोलिसांच्या तिन्ही पथकांनी तपास सुरू केला आहे.

# राख वाहून नेणाऱ्या वाहनांवर आरटीओची कार्यवाही

## अकरा वाहनांना ठोठावला सहा लाखांचा दंड

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,(दि.15)** – रतन इंडिया औष्णिक उर्जा वीज प्रकल्पातून राखेची वाहतूक करणारे वाहनाची आरटीओ विभागाकडून तपासणी मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेअंतर्गत मोटार वाहन कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या 11 वाहनांना 6 लाख 10 हजाराचा दंड प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून ठोठाविण्यात आला.

गेल्या दोन दिवसापासून विशेष तपासणी मोहीम अंतर्गत रतन इंडिया ऊर्जा प्रकल्पातून निघणाऱ्या प्रत्येक वाहनाची तपासणी करण्यात आली. यामध्ये राखेची वाहतूक करणारे अकरा बलकर वाहनावर मोटार वाहन कायद्याच्या विविध कलमान्वये कार्यवाही करण्यात येऊन त्यांच्याकडून सहा लाख दहा हजार रुपये दंड वसूल करण्यात आला.

प्रादेशिक परिवहन अधिकारी श्रीमती उर्मिला पवार, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी प्रशांत देशमुख यांच्या मार्गदर्शनात मोटार वाहन निरीक्षक प्रताप राऊत, प्रमोद सरोदे, सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक शिवप्रसाद मवाळ, राहुल मुडे, कृष्णा नेवरे, वाहन चालक मोहम्मद अतहर, रितेश मेश्राम व अमोल गावनेर यांनी ही कार्यवाही केली.



# हिंदू-मुस्लिम एकतेचे प्रतीक बालाजी यात्रा महोत्सव

### कोजागिरी पौर्णिमेच्या मुहूर्तावर होते आयोजन

**महासागर प्रतिनिधी**

**चांदुर बाजार,(दि.15)** – तालुक्यातील देवाचा वाडा म्हणून प्रसिद्ध प्राप्त असलेल्या देऊरवाडा काजळी या गावांमध्ये कोजागिरी पौर्णिमेला बालाजी यात्रा महोत्सव मोठ्या आनंदाने पार पाडला जातो. दरवर्षी याठिकाणी मोठ्या धुमधडाक्यात हा महोत्सव साजरा केला गेला.

विजया दशमी च्या दिवशी श्री बालाजी याची घटस्थापना होते.देऊरवाडा या गावामध्ये लक्ष्मीनारायण ब्रम्हणपुरी बालाजी(मोठे बालाजी)आणि लक्ष्मीनारायण भोंगाडेपुरी बालाजी (लहान बालाजी) असे दोन मंदिर आहे.

विजया दशमीच्या दोन दिवसानंतर मोठे बालाजी यांच्या पालखी ची रात्रीला संपूर्ण देऊरवाडा या गावातून दिंडी द्वारे प्रदक्षिणा घातली जाते. त्यांनतर दुसऱ्या दिवशी रथ ची मिरवणूक रात्रीच्या वेळी काढली जाते. त्यामध्ये ढोल-ताशे, दिंडी, भजन मंडळी, बँड पथक यांचा ही समावेश असतो. काजळी आणि देऊरवाडा या दोन्ही गावातील भाविक भक्त याचा आनंद यांनी घेतला जातो. त्याच प्रमाणे कोजागिरी पौर्णिमेला लहान बालाजी यांचा रथ संपूर्ण गावातून रात्रीला मिरवणूक काढली जाते तर त्याची पालखी अगोदरल्या दिवशी काढली जाते.

या दोन मंदिर समोर मुस्लिम बांधवांची मजीद असून ते सुद्धा या यात्रा महोत्सव चा आनंद घेताना या ठिकाणी पहावयास मिळते. दि.14 ऑक्टोबर ला मोठे बालाजी यांची पालखी संपुर्ण गावात फिरवली जाते त्यानंतर 15 ऑक्टोबर ला रथ आणि लहान बालाजी यांची पालखी तर 16 ऑक्टोबर ला लहान बालाजी रथ गावामधून रात्रभर फिरवला जातो. दोन्ही रथ आणि पालखी मध्ये बालाजी यांच्या मूर्ती ठेवल्या जातात. देऊरवाडा या ठिकाणी तिरुपती बालाजी येथील बालाजी हे अडीच दिवस मुक्कामी येत असल्याचे बोलले जाते. दि.17 ऑक्टोबर ला सायंकाळी 6 च्या सुमारास मोठे बालाजी या ठिकाण ची रथ हा पूर्णा नदी मध्ये येतो आणि त्या ठिकाणी तालुक्यातील हजारो संख्येने येणारे भाविक आरती करतात. त्यानंतर दुसऱ्या दिवशी म्हणजे 18 ऑक्टोबर 2024 ला लहान बालाजी यांच्या रथ समोर आपले नवस पूर्ण झालेले भाविक लोटांगणे पडत असतात. त्यानंतर पुन्हा सायंकाळी रथ हा नदी च्या दिशेने वारकरी भजन मंडळी वाजत-गाजत आणला जातो. नदीमध्ये तिर्थविसर्जन केले जाते. यावेळी जवळपास हजारोच्या वर भाविकांनी या नेत्रदीपक सोहळा आपल्या डोळ्यात सामावून घेतात. तर या बालाजी यात्रा महोत्सव ला जवळपास 455 पूर्वी चा इतिहास असल्याची आख्यायिका आहे. या यात्रेत दरम्यान शिरजगाव कसबा पोलिसचा मुक्काम हा तीन दिवस देऊरवाडा या ठिकाणीच असतो.



# कुख्यात दर्शन महल्लेवर एम.पी.डि.ए ची कारवाई

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 15)** – शहरातील कुख्यात गुन्हेगार दर्शन विलास महल्ले (22,रा.शिवाजी चौक, नवसारी, अमरावती) याच्याविरुध्द एमपीडीएची कारवाई करण्यात आली असून, त्याला वर्षभरासाठी जिल्हा मध्यवर्ती कारागृहात स्थानबध्द करण्यात आले आहे.

दर्शन महल्ले हा सन 2022 पासुन गुन्हेगारी कार्यवाहीमध्ये सक्रीय होता. त्याच्याविरूध्द गाडगेनगर पोलिस ठाण्यात खुनाचा प्रयत्न करणे, दरोड्याबद्दल शिक्षा, मृत्यु किंवा जबर दुखापत घडवुन आणण्याचा प्रयत्नासहीत जबरी चोरी किंवा दरोडा, गृह अतिक्रमण करणे, जबर दुखापत घडवुन आणण्याची धमकी, मानवी किंवा इतरांच्या व्यक्तीगत सुरक्षीतता धोक्यात येईल अशी कृती करणे. प्राणघातक हत्यारानिशी सज्ज होवुन दंगा करणे, अटकेस प्रतिकार किंवा अटकाव करणे, अश्लील कृती करणे, शांतता भंग घडवुन आणण्याच्या उद्देशाने अपमान करणे, अवैध शस्त्र बाळगणे, अग्णीशस्त्र बाळगणे, अधिसुचनांचे उलघंन करणे, हद्दपार आदेशाचे उल्लघंन करणे, अशा प्रकारचे गंभीर स्वरूपाचे एकुण 11 गुन्हे दाखल आहे. त्याच्यावर यापुर्वी प्रतिबंधक कारवई करण्यात आलेले आहे. तसेच त्यास तडीपार सुध्दा करण्यात आले होते, तरी सुध्दा तो गुन्हेगारी क्षेत्रात सक्रीय आहे. त्यामुळे त्याच्याविरूध्द गाडगेनगर ठाण्याचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक यांनी एमपीडीएचा प्रस्ताव तयार केला. एसीपी अरूण पाटील व पोलिस उपायुक्त सागर पाटील, कल्पना बारवकर यांच्या मार्फतीने पाठविलेल्या प्रस्तावाची एसीपी शिवाजी बचाटे व पोलिस निरीक्षक सिमा दाताळकर (प्रशासन) गुन्हे शाखा यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेतील एम.पी.डी.ए. सेलमधील एपीआय इम्रान नायकवडे, पोलीस अंमलदार विनय गुप्ता, अजय मिश्रा, चेतन कराडे तसेच गाडगेनगर येथील पोलिस हवालदार राजेश गुरेले यांनी पुर्तता केली. सदर प्रस्तावावर पोलीस आयुक्त नविनचंद्र रेड्डी यांनी 14 ऑक्टोबर रोजी आदेश पारीत केले. त्यानंतर गाडगेनगरचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांच्यामार्फत आदेश तामिल करून दर्शन महल्लेला स्थानबध्दतेच्या कालावधीकरीता मध्यवर्ती कारागृह 15 ऑक्टोबर रोजी दाखल करण्यात आले आहे. यापुढेही शहरातील सराईत गुन्हेगारांवर एम.पी.डी.ए. कायदयाखाली कारवाई करण्यात येणार आहे.


आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# चारचाकी वाहनांच्या टोलमुक्तीसाठी रास्तारोको

## टोल नाक्यावर थांबविली वाहने, कार्यकर्त्यांची निदर्शने ■ महाविकास आघाडीचे राजमार्ग प्राधिकरणला निवेदन

**महासागर प्रतिनिधी**
**नांदगाव पेठ,( दि.15 )–** मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मुंबईमधील पाच टोल नाक्यावर चारचाकी वाहनांना टोल मुक्त करण्याचा निर्णय घेतला आणि आजपासून तो अंमलात देखील आणला मात्र याच धर्तीवर मुंबईच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रातील टोल नाक्यावरून तसेच नांदगाव पेठ येथील आयआरबीच्या टोल नाक्यावरून चारचाकी वाहनांना टोलमुक्त करा या मागणीसाठी महाविकास आघाडीने नांदगाव पेठ येथील टोलनाक्यावर रस्ता रोको आंदोलन केले. यावेळी टोल नाक्यावर वाहने देखील अडविण्यात आली होती. महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांनी एकतर्फी निर्णय घेणाऱ्या मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व महायुती सरकारचा यावेळी निषेध केला.






नांदगाव पेठ येथील टोल नाक्यावरून देखील हजारो शेतकरी, व नागरिकांची चारचाकी वाहने जातात. एकीकडे महागाई आकाशाला भिडली असतांना एका गावातुन दुसऱ्या गावात जातांना दोनशे रुपयांचा फटका नाहक नागरिकांना बसतो आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतलेला हा निर्णय केवळ मुंबईपुरताच का असा सवाल सुद्धा आंदोलकांनी उपस्थित केला आहे. मुंबई प्रमाणे महाराष्ट्रातील सर्वच टोल नाक्यावर व नांदगाव पेठ येथील टोल नाक्यावर चारचाकी वाहनांना टोल मुक्त करा, त्यांच्याकडून कोणत्याही प्रकारचेशुल्क आकारण्यात येऊ नये अश्या आशयाचे निवेदन महाविकास आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांना दिले आहे.

महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांनी टोल नाक्यावरील वाहने अडवून यावेळी प्रचंड घोषणाबाजी केली, सरकार विरोधात तीव्र निदर्शने करत संपूर्ण राज्यातील वाहनांना टोलमुक्त करण्याच्या घोषणा दिल्या. येत्या दोन दिवसात नांदगाव पेठ येथील टोल चारचाकी वाहनांना मुक्त केला नाही तर महाविकास आघाडीच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा देखील देण्यात आला.यावेळी टोल नाक्यावर महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांनी आंदोलनात्मक भूमिका घेतल्याने नांदगाव पेठ पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक महेंद्र अंभोरे यांनी तातडीने आंदोलनस्थळ गाठून आंदोलकांशी चर्चा केली व वाहतूक सुरळीत केली.

यावेळी महाविकास आघाडीचे प्रा. मोरेश्वर इंगळे, संजय चौधरी, दिलीप चौधरी, बाळासाहेब देशमुख, नितीन हटवार,अरुण राऊत, राजेश बोडखे, अमित गावंडे, पंकज शेंडे, चंदू राऊत,विनोद डांगे, शशी बैस,शेख तौसिफ,आनंद लोहोटे, नितीन वैष्णव, ओम राऊत,मो. नसीम खान, बाळासाहेब राऊत, अनिल कीर्तकार,संजय नागोणे, ज्ञानेश्वर बारस्कर यांसह शेकडो पदाधिकारीव कार्यकर्ते उपस्थित होते.

# जि. प. गर्ल्स हायस्कूल विभागातून प्रथम

## ■‘मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा’ अभियान■

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.15 ) –** नुकतेच मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अभियान टप्पा क्र. 2 चे शासनामार्फत निकाल घोषित करण्यात आले. येथील कॅम्प स्थित जिल्हा परिषद गर्ल्स हायस्कूल ला अमरावती विभागातील पाच जिल्ह्यामधून शासकीय गटातून प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळाले आहे. शाळेचे मुख्याध्यापक तथा वर्ग 2 पदावर कार्यरत असणारे गटशिक्षणाधिकारी धनंजय वानखडे यांचे नेतृत्व, सखोल मार्गदर्शन आणि अपार मेहनतीने शाळेच्या सर्व प्रशिक्षित चमुच्या साहाय्याने शाळेने ही मजल मारली आहे.



मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अभियान टप्पा क्र. 2 मध्ये पायाभूत सुविधा, शासन ध्येय धोरण अंमलबजावणी आणि शैक्षणिक संपादणूक अशा विविध पैलूचे एकूण 150 गुणांचे मुल्यांकन विविध केंद्रस्तर,तालुकास्तर, जिल्हा स्तर, विभागस्तर आणि राज्यस्तरीय समिती कडून मुल्यांकन करण्यान आले. एकूण 21 लक्ष रुपयांचे बक्षिस शाळेने प्राप्त झाले आहे. नुकतेच दि.15 ऑक्टोंबर रोजी शाळेला शासनामार्फत आयोजित जमशेद भाभा थिएटर एन.सी.पी.ए., मुंबई येथे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजितजी पवार, शिक्षणमंत्री दिपक केसरकर, शालेय शिक्षण सचिव आय. ए. कुंदन प्रधान आणि शिक्षण आयुक्त सुरज मांढरे यांच्या हस्ते शाळेच्या सर्व चमुला आमंत्रित करून प्रशस्तीपत्र, सन्मानचिन्ह आणि 21 लक्ष रुपयाचे धनादेश देवून सन्मानित करण्यात आले आहे.

# आयटीआयला एकनाथ रानडे यांचे नाव देणे हा अभिमानास्पद

## आ.प्रताप अडसड यांचे प्रतिपादन ■ नांदगाव आयटीआयचा नामकरण सोहळा संपन्न






**महासागर प्रतिनिधी**
**नांदगाव खंडेश्वर, ( दि.15 )–** एकनाथराव रानडे हे भारतातील सामाजिक व आध्यात्मिक चळवळीतील एक खंदे कार्यकर्ते होते. ते आपल्या संघटनात्मक कार्यासाठी नावाजलेले होते. त्यांनी कन्याकुमारी येथे विवेकानंद शिला स्मारकाची आणि विवेकानंद केंद्र या सामाजिक व आध्यात्मिक संस्थेची स्थापना केली. त्यांनी कन्याकुमारी येथे विवेकानंद शिला स्मारकाची उभारणी केली. त्यांचा जन्म नांदगाव तालुक्यातील टिमटाळा येथे झाला असुन त्यांचे नाव याच तालुक्यातील आयटीआयला देणे हा राज्यशासनाचा अभिमानास्पद निर्णय असुन त्यांचे मी आभार मानतो. या आदर्श नेतृत्वाच्या नावाने आयटीआयला ओळख मिळाल्याने विद्यार्थ्यांना त्यांच्या कार्याची शिकवण व प्रेरणा मिळेल असे प्रतिपादन आमदार प्रताप अडसड यांनी केले. ते नांदगाव खंडेश्वर येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय) मध्ये आयोजित नामांतरण सोहळा व फलकाच्या उद्घाटन प्रसंगी शुक्रवारी (ता. 11) बोलत होते.

कॅबिनेट मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या पुढाकारामुळे महाराष्ट्रातील 143 शासकीय औद्योगिक संस्थांचे नामकरण यशस्वी पणे करण्यात आले आहे. यामध्ये शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, नांदगाव खंडेश्वरचे नामांतरण एकनाथराव रानडे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, नांदगाव खंडेश्वर असे करण्यात आले. यानंतर आयटीआयचा नामांतर सोहळा व फलकाचे उद्घाटन शुक्रवारी आमदार प्रताप अडसड यांच्या शुभहस्ते पार पडले. सदर कार्यक्रम प्राचार्य नंदनसिंह भुकवाल यांच्या मार्गदर्शनात पार पडला. यावेळी माजी नगराध्यक्ष संजय पोफळे, प्रदीप जोशी, नवल खिची, योगेश खंडार, उमेश चौकडे, राजु दिवेकर, विनोद गोलाईत, योगेश झिमटे यांसह अनेक तालुकावासी उपस्थित होते.

# 16 ऑक्टोबर पासून आ. खोडके यांची जनआशीर्वाद यात्रा

## महिनाभर घरोघरी जाऊन साधणार जनतेशी थेट संवाद

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि.15 )–** विधानसभा सार्वत्रिक निवडणूक 2024 च्या अनुषंगाने आ.सुलभा संजय खोडके यांच्या झंझावती जनआशीर्वाद यात्रेला सुरवात होणार आहे. बुधवार दिनांक 16 ऑक्टोबर 2024 पासून सायंकाळी 5.30 वाजता जवाहर नगर त्रिमूर्ती भक्तिधाम मंदिर येथून आ. सुलभा खोडके यांच्या जनआशीर्वाद यात्रेला सुरुवात होणार असून नवसारी भाग, जवाहर नगर, रेखा कॉलनी, निशिगंधा कॉलनी, अरुण कॉलनी, कौशिक विहार, कल्पना नगर, सुशांत कॉलनी, आदी भागात पदयात्रा करण्यात येईल. या दरम्यान आ.सुलभा खोडके या नागरिकांच्या घरी भेटी देणार असून त्यांच्याशी संवाद साधून आशीर्वाद घेणार आहे. मागील पाच वर्षापासून आ.सुलभा खोडके या अमरावती विधानसभा मतदार संघाच्या लोकप्रतिनिधी असून त्यांच्या कार्यकाळात झालेल्या विकास कामांची माहिती सुद्धा स्थानिक नागरिकांना देण्यात येणार आहे. तसेच आगामी विकासाचे व्हिजन तयार करून नियोजित कृती कार्यक्रमाविषयी सुद्धा नागरिकांना माहिती देण्यात येईल. 16 ऑक्टोबर पासून सुरु होणारी आ. सुलभा खोडके यांची




जनआशीर्वाद यात्रा येत्या महिनाभर चालणार असून थेट-भेट थेट संवाद, व डोअर टू डोअर दौरा करून नागरिकांच्या भेटीगाठी व आशीर्वाद घेणार आहे. अमरावती विधानसभा निवडणुकीत आपण सर्वांची साथ , विश्वास व आशीर्वाद लाभावे, यासाठी जनआशीर्वाद यात्रेच्या माध्यमातून आ.सुलभा खोडके जनतेच्या भेटीला येत आहे. यामध्ये जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आ. सुलभात खोडके यांनी केले आहे.

# हत्याप्रकरणातील तीन आरोपींना जन्मठेप

## अमरावती न्यायालयाचा निर्णय

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि. 15 ) –** हत्याप्रकरणातील तिन आरोपींना जिल्हा व सत्र न्यायालय क्रमांक 4 चे न्यायाधीश एच.एल. मनवर न्यायालयाने मंगळवारी जन्मठेपेची शिक्षा सुनावली. ही घटना 20 फेब्रुवारी 2022 रोजी वलगाव रोडवरील सिकची रिसॉर्टजवळ घडली होती. शिक्षा झालेल्या आरोपींमध्ये कृष्णा उर्फ किसना भोसले (35), बिसन रघुनाथ शिंदे (25) आणि राजेश रघुनाथ शिंदे (23, सर्व रा. दसरा मैदान, अमरावती) यांचा समावेश आहे. या घटनेत कन्हैया पवार (रा. अकोट) याचा मृत्यू झाला होता.

वलगाव रोडवरील सिकची रिसॉर्टजवळील मोकळ्या जागेत कन्हैया पवार आणि त्याची पत्नी हे तात्पुरते घर बांधून राहत होते. त्यावेळी आरोपी कृष्णा भोसले, बिसन शिंदे, राजेश शिंदे हे त्यांच्या समाजातील असल्याने ते शेजारी राहत होते. 20 फेब्रुवारी 2022 रोजी आरोपी कृष्णा, बिसन आणि राजेश हे आपापसात भांडत होते. त्यावेळी कन्हैया आणि त्याची पत्नी वाद सोडवण्यासाठी गेले. त्यानंतर आरोपी बिसन आणि राजेश यांनी कन्हैयाला पकडून ठेवले आणि कृष्णा भोसले याने त्याच्या छातीवर चाकूसारख्या धारदार शस्त्राने वार केले. या हल्ल्यात .कन्हैयाचा जागीच मृत्यू झाला. या घटनेनंतर कन्हैयाच्या पत्नीने वलगाव पोलीस ठाण्यात



तक्रार केली. त्यानुसार वलगाव पोलिसांनी आरोपींविरुध्द हत्येचा गुन्हा दाखल केला. याप्रकरणाचा तपास पीएसआय अयुब हिराजी शेख यांनी पूर्ण करून, न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. जिल्हा व सत्र न्यायालय क्रमांक 4 चे न्यायाधीश एच.एल. मनवर यांच्या न्यायालयात सरकारच्या वतीने अतिरिक्त सरकारी वकील मंगेश भागवत यांनी एकूण आठ साक्षीदार तपासले. दोन्ही पक्षाच्या युक्तिवादानंतर आरोपीचा दोष सिध्द झाला. त्यानुसार जिल्हा व सत्र न्यायाधीश यांनी तिन्ही आरोपींना भादंविच्या कलम 302 अन्वये जन्मठेप आणि 5 हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली. तसेच 5 हजारांचा दंड न भरल्यास 6 महिने सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली.

# 1.20 कोटींचा मार्गाच्या निर्माणकार्यावर प्रश्नचिन्ह

## दर्जाहिन काम करणाऱ्या कंत्राटदारावर होणार कारवाई का ?



### ■ नागरिकांनीच ठेवले लक्ष

या मार्गाचे बांधकाम आधीपासूनच निकृष्ट दर्जाचे दिसत असल्याने नागरिकांनी या कामाकडे बारकाईने लक्ष दिले. त्यांना या निर्माण कामात सिमेंटचा अभाव, निव्वळ डस्टचा वापर, वाळू फक्त दाखविण्याकरिता आणून ठेवल्याचे, बांधकामावर पाणी टाकत नसल्याचे दिसून आले. त्यामूळे बांधकाम होताच काही तासातच त्यावरील गिट्टी उखडणे सुरु झाले.

### ■ मार्गाची गुणवत्ता योग्य- अभियंता आवारे

या संदर्भात कनिष्ठ अभियंता शुभम आवारे यांच्या सोबत संपर्क केला असता त्यांनी मार्गाची गुणवत्ता योग्य असल्याचे सांगत ज्या ठिकाणी काम निकृष्ट झाले तेथे काम व्यवस्थित करवून घेवू असे सांगितले.

### ■ कामाचा दर्जा सुधारून घेऊ

या बाबत उपकार्यकरी अभियंता मिलींद भेंडे यांच्या सोबत संपर्क केला असता त्यांनी रोडच्या कामाचा दर्जा सुधारून घेऊ असे सांगितले.

**महासागर प्रतिनिधी**
**चांदूर बाजार, ( दि.15 )–** तालुक्यातील देऊरवाडा ते मार्कंडा मार्ग 1.20 कोटी खर्चुन निर्माण करण्यात आला आहे. परंतू या मार्गाच्या निर्माण कार्यावर प्रश्नचिन्ह झाले आहे. अश्या दर्जाहिन काम करणाऱ्या कंत्राटदारावर कारवाई होईल की, नाही याकडे गावकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

मतदार संघाचा विकास करत असताना आमदारांना अनेक कागदपत्रे तयार करून मंत्रालयामध्ये अनेक टेबल फिरावे लागते. मात्र असे असताना विकास कामासाठी आमदार निधी आणतात. विकास काम मंजूर झाल्यावर गाव पातळीवर त्याची देखभाल आणि कामाची जबाबदारी ज्या विभागाकडे जाते, त्या विभागाचे दुर्लक्ष झाले तर कामा मध्ये निकृष्टपणा होत असल्याचे चित्र स्पष्ट दिसत आहे. देउरवाडा मधून जाणारा मार्कंडा रोड हा जवळपास एक कोटी वीस लाख रुपयाचा असून जिल्हा नियोजन भवन कामातून रोडचे बांधकाम मंजूर झाले आहे. मात्र या मार्गाचे बांधकाम होत असताना संबंधित कंत्राटदाराकडून या ठिकाणी नियमाची पायमल्ली होत आहे. तसेच आवश्यक त्या प्रमाणात बांधकामाची गुणवत्ता व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यपद्धतीवरुन अधिकारी आणि कंत्राटदाराची भूमिका संशयास्पद वाटत आहे.

सदर काम निकृष्ठ होत असल्याचे अनेक तोंडी तक्रारी गावकऱ्यांनी आमदारांच्या स्वीय सहाय्यकांना केल्या. त्यांच्या गावातील मार्ग असल्याने हा गंभीर प्रकार त्यांनी आमदारांच्या कानावर घातला.

आमदारांनी संबधित कंत्राटदार आणि अधिकारी यांना कामाबाबत चांगलाच दम दिला. त्यानंतर अधिकारी आणि ठेकेदार यांची कामावर भेट दिली. मात्र अजूनही कामाचा दर्जा सुधारला नसल्याने आमदारांनी आपल्या नियोजित दौरा दरम्यान मार्गाची परत पाहणी केली. कामाचा दर्जा सुधारण्याबाबत अधिकाऱ्यांना तंबी दिली. अधिकारी ज्या ठिकाणी काम निकृष्ट झाले, तेथे व्यवस्थित करुन घेवू असे म्हणत आहेत. कार्यकारी अभियंता प्रमोद वानखडे हे या मार्गाच्या निर्माणकार्याला भेट देणार आहे. आता ते काय सूचना करतील हे पहावे लागेल. मात्र निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या कंत्राटदारावर मात्र कारवाई करण्याबाबतीत अधिकारी ‘ब्र’ शब्द काढायलाही तयार नाहीत.

# रस्त्यावरचे वाढते अतिक्रमण अपघाताला निमंत्रण

### अतिक्रमण हटाव मोहीम नावालाच

**महासागर प्रतिनिधी**
**वरूड, ( दि.15 )–** शहरातील नगर परीषद, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या हद्दीतील मुख्य रस्त्यावर दिवसेंदिवस अतिक्रमण वाढत असल्याने फुटपाथ व सौंदर्यीकरण केलेले रस्ते अरूंद होत आहेत. पाच वर्षात एखादी वेळा अतिक्रमण मोहीम राबवली असेल तेव्हापासुन शहरात अतिक्रमण हटाव मोहीम करण्यात आली नाही. तशी त्यांना गरजही वाटली नसावी त्यामुळेच परिस्थितीत ‘जैसे थे’ आहे.



शहरातील प्रत्येक चौक डेंजरस स्पॉट बनत आहे. वाहन चालवणे म्हणजे जणू काही आत्मघातच असे नागरीकांना वाटु लागले आहे. शहरातील फुटपाथवरील अतिक्रमण व अनियंत्रीत वाहतुकीची समस्या नागरीकांसाठी दिवसेंदिवस अडचण व मनस्तापाची ठरत आहे. या बिघडलेल्या परिस्थितीला कधी लगाम लागणार, असा प्रश्न नागरीकांना पडला आहे. एसटी आगारापासुन तर बसस्थानक, तहसील कार्यालय. मुलताई चौक, पांढुर्णा चौक, इंदीरा चौक , केदार चौक, गांधी चौक, सावता चौक, कृषी उत्पन्न बाजार समिती, रेस्ट हॉऊस, जॉयंटस चौक, पारडी बोरांग चौक, राजुरा बाजार नाका आदी ठिकाणी वाहन धारकांची व पादचारांची सतत गर्दी होते. मात्र मुख्य रस्तावर व फुटपाथवरच अतिक्रमण करून आपली उपजिविका भागवण्यासाठी बेरोजगार यांनी छोटेमोठे हॉटेल, पानटपरी, सायकल दुरूस्ती, मोबाईल शॉपी, फळ विक्री, कापड विक्री, पाणी पुरी, फुल विक्रेते, केस कर्तनालयाची अनधिकृत अस्थायी दुकाने थाटली आहे. त्यातच ठिकठिकाणी पार्कींगसाठी अधीकृत जागा नसल्याने रस्त्यावरच जागा मिळेल, तेथे वाहने उभी केली जातात त्यामुळे रस्त्यावर वाहणांची कोंडी, बेभान धावणारी वाहने, चुकीच्या दिशेने होणारे ओव्हरटेक, वाहतुक नियमाची होणारी उल्लंघन, पालकांनी अल्पवयीन मुलांच्या हातात दिलेली वाहने , टिपल सिट चालणारी वाहने, याचेच चित्र पाहायला मिळते. अशा स्थीतीत पादचाऱ्यांना व शाळा सुरू होण्यापुर्वी व शाळा सुटल्यानंतर विद्यार्थ्यांना जिव मुठीत घेवुनच ये-जा करावी लागते. हे सर्व दृष्या अंगावर काटे आणनाऱ्या परिस्थितही पोलीस, नगरपरीषद, सार्वजनिक बांधकाम विभागाची यंत्रणा मात्र हातावर हात ठेवत आहे. यामुळेच शहरात अपघाताचे प्रमाण वाढलेले आहे.